# ASSIGNMENT

Page No. 1
Date 29|02|24

Name :- Suryawanshi Rohini Subhash

Class :- B.Com. FY   Div :- 'A'

Subject :- 'Farmer Interview'

Roll No :- 33095

1) तुमचे नाव काय आहे ?
→ माझे नाव सुर्यवंशी सुभाष आहे.

2) तुम्ही महाराष्ट्रात कुठे राहता ?
→ मी महाराष्ट्रातील लातूर जवळ असलेल्या शिऊर या छोट्या गावात राहतो.

3) तुम्ही शेती कधीपासून करत आहात ?
→ मी शेती २० वर्षांपासून करत आहे.

4) तुम्ही तुमच्या शेतामध्ये कोणकोणत्या पिकांची लागवड करता ?
→ मी माझ्या शेतामध्ये गहू, ज्वारी, सोयाबीन, वाटाणा, मूग, मसूर आणि हरभरा अशा पिकांची लागवड करतो.

5) शेती करताना तुम्हाला कोणत्या अडचणी येतात ?
→ शेती करताना मला पाण्याची कमतरता, कीटक आणि रोग या समस्या येतात. तसेच शेतामधील धान्य काढण्यासाठी वेळेवर कामगार भेटत नाहीत. अशा प्रकारच्या समस्या अढळून येतात.

6) शेतीसाठी कोणते तंत्रज्ञान चा वापर करता ?
→ मी शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरतो, जसे की ट्रॅक्टर, पाणीपुरवठा यंत्रणा आणि किटकनाशक

7) तुमचे वार्षिक उत्पन्न आणि शेतीसाठी कोणत्या प्रकारची खते वापरतात?

→ माझे वार्षिक उत्पन्न 2-3 लाख येवढे आहे आणि मी शेतीसाठी रासायनिक खते आणि सेंद्रिय खते असे दोन्ही खतांचा वापर करतो.

8) तुम्ही शेतीसाठी कोणत्या प्रकारच्या पीक विमा योजनाचा लाभ घेता?

→ मी शेतीसाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना आणि महाराष्ट्र राज्य पीक विमा योजना यांचा लाभ घेतो.

9) तुम्हाला शेतीमध्ये कोणत्या प्रकारची मदत हवी आहे?

→ मला शेतीसाठी पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि रस्ते यांची सुविधा हवी आहे.

10) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारचे प्राशिक्षण हवे आहे?
मला शेतीत आधुनिक तंत्रज्ञान आणि कीटकांशी लढण्याचे प्राशीक्षण हवे आहे.

11) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या सरकारी योजनांची आवश्यकता हवी?

→ मला शेतीसाठी आधीक सरकारी योजनांची आवश्यकता आहे. जेणेकरून मी माझी शेती आधीक फायदेशीर बनवू शकेन.

12) तुम्ही शेतीसाठी कोणत्या प्रकारच्या बँक कर्जाचा लाभ घेता?

→ मी शेतीसाठी दीर्घकालीन बँक कर्जाचा लाभ घेतो.

13) तुम्ही शेतीचे उत्पन्न कसे वाढवता ?
→ मी शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतो.

14) शेतीसाठी तुम्ही कोणत्या प्रकारच्या पिक विमा योजनाचा लाभ घेता ?
→ मी फळबाग पिक विमा योजना आणि भाजीपाला पिक विमा योजना यांचा लाभ घेतो.

15) तुम्ही शेतीसाठी कोणत्या प्रकारच्या सरकारी अनुदानाचा लाभ घेता ?
→ मी प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना आणि महाराष्ट्र राज्य कृषि विकास अनुदान योजना याचा लाभ घेतो.

16) तुम्ही शेतीसाठी कोणत्या प्रकारच्या बाजारपेठेचा वापर करता ?
→ मी शेतीसाठी स्थानिक बाजारपेठेचा वापर करतो.

17) तुम्ही शेतीसाठी कोणत्या प्रकारच्या संरक्षण पद्धतीचा वापर करता ?
→ मी शेतीसाठी शेतीमालाची विमा योजना आणि शेतमालाची साठवणूक पद्धती यांचा वापर करतो.

18) तुम्ही शेतीसाठी कोणत्या प्रकारच्या सरकारी योजनांची माहिती मिळवता ?

→ मी शेतीसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सरकारी योजनांची माहिती मिळवण्यासाठी मी कृषि विभागाच्या कार्यालयात जातो आणि तेथून मी शेती योजनांची माहिती मिळवतो.

19) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या पूरक व्यवसायाची आवश्यकता आहे ?

→ मला शेतीसाठी दुग्ध व्यवसायाची आवश्यकता आहे.

20) तुम्हाला कोणत्या प्रकारची शेती करायला आवडते ?

→ मला सिंचित शेती करायला आवडते.

21) तुमच्या मते, शेतीसाठी कोणते तंत्रज्ञान सर्वात उपयुक्त आहे ?

→ माझ्या मते, शेतीसाठी स्मार्ट खेती तंत्रज्ञान सर्वात उपयुक्त आहे.

22) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते ?

→ मला शेतीत पाण्याची समस्या आणि कीटकनाशकांच्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम या समस्यांना सामोरे जावे लागते.

23) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या यशस्वीतेचा अनुभव आला आहे ?

→ मला शेतीत माझ्या शेतमालाला चांगला भाव मिळाल्याचा यशस्वी अनुभव आला आहे. पण मला एक प्रश्न येतो की, शेतकरी हा त्या

मालाचा स्वतः मालक असून त्याच्या पिकाला तो भाव का ठरवू शकत नाही. पिकांना भाव तर देतात पण तो भाव हा शेतकऱ्यांच्या मनावर दिला पाहिजे असं मला वाटतं.

24) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या अपयशाचा अनुभव आला आहे?

→ मला शेतीत माझ्या पिकांचे नुकसान आल्याचा अपयश अनुभव आला आहे. कधी-कधी नैसर्गिक आपत्ती मुळे पिकांचे खूप नुकसान होते.

25) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या भविष्यवाणी आहे?

→ मला असं वाटतं की, भविष्यामध्ये जैविक शेती पद्धतीचा वापर वाढेल आणि सर्व शेतातील कार्य हे विविध यंत्रावरच होतील.

26) तुम्हाला शेतीत कोणत्या प्रकारच्या कल्पना आहेत?

→ मला शेतीत शेतमालाची साठवणूक करण्याची कोल्ड स्टोरेज सुविधा उभारण्याची कल्पना आहे.

# निष्कर्ष



मला शेतीविषयी मुलाखत घेऊन खूप छान वाटलं. कारण मला या मुलाखती-मधून शेतीविषयी खूप सारी माहिती मिळाली. शेतीमध्ये कोणकोणते पीक घेतले जातात ते कुशाप्रकारे शेतात पीक घेतात या सर्वांची माहिती मला मिळाली. शेतीमध्ये येणाऱ्या अडचणी आणि त्या अडचणी कशाप्रकारच्या असतात त्या मला या मुलाखतीमधुन समजलं. शेतीमध्ये गहू, ज्वारी, मका, ज्वारी, मूग अशा पिकांची लागवड केली जाते. शेती करताना पाण्याची कमतरता येते. कीटक आणि रोग या समस्या येतात. तसेच शेतामधील धान्य काढ-ण्याची वेळेवर मजूर मिळत नाहीत. अशा समस्या शेती करताना येतात.

त्यांनी पिकांची लागवड कशी केली आणि त्या साठी कोण-कोणती खते वापरली याची माहिती मिळाली. आणि ते कोण-कोणत्या समस्यांना सामोरे गेले हे या मुलाखतीतून समजले. त्यांनी मूग, वाटाणा, गहू, ज्वारी इ. पिकांची लागवड कशा प्रकारे केले आणि बिया कोणत्या वापरल्या याची माहिती दिली. त्यांनी कोण-कोणत्या प्रकारची जमीन असतात आणि कोणत्या ऋतू मध्ये कोणते पीक घेतले जाते हे सांगितले. आणि हंगामी पिके कोणती आणि रब्बी पिके कोणती याची माहिती अत्यंत चांगल्या प्रकारे सांगितली.

मला या मुलाखती मधुन एक गोष्ट वाटते की, शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव दिला जावा. कारण, शेतकरी हा

शेतात राब राब राबून काम करतो तसेचे
तो कुठल्या ही प्रकारचा विचार न करता
म्हणजे शेतीमध्ये अपयश येईल, यश
येईल या गोष्टींचा विचार करत नाहीत.
मला असं वाटतं की ते त्यांच्या पिकांचे
स्वतः मालक आहेत. तर, त्यांच्या पिकांची
त्यांनी स्वतः भाव का ठरवत नाहीत.
प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या धान्याचा
योग्य भाव ठरवून तो विकला पाहिजे.
खरंच मला या मुलाखतीमधून खूप
चांगली माहिती मिळाली. आणि मला
खूप छान वाटलं.